# जनगणना प्रतिनिधी ला कसे ओळखाल?

## जनगणनेच्या कार्यालयातून कुणाला घरी पाठवण्यात येते का?

जनगणनेची सुरुवात मार्च २०२० मध्ये केली जाईल. तुम्ही जनगणनेला एप्रिल २०२० पर्यंत उत्तर देऊ शकता, ह्या बाबतीच्या सूचना आणि रिमायंडर्स (स्मरणपत्र) जनगणनेच्या कार्यालयातून तुम्हाला पोस्टाने पाठवण्यात येईल. तुम्ही फोन, ऑनलाईन किंवा पेपर च्या माध्यमातून आपले उत्तर नोंदवू शकता. तुम्ही जर दिलेल्या वेळेत म्हणजे मार्च किंवा एप्रिल मध्ये जर उत्तर दिलेत तर जनगणना प्रतिनिधी तुमच्या घरी येणार नाही. पण जर तुमचं उत्तर द्यायचे राहून गेले असेल तर मे महिन्याच्या साधारण १५ तारखेपासून, जनगणना प्रतिनिधी तुमच्या घरी भेट देऊ शकतात.

## जनगणना प्रतिनिधी कोण आहे?

जनगणना प्रतिनिधी किंवा जनगणना गणक हि व्यक्ती तुमच्या समुदायामधलीच असून जनगणना कार्यालयातून त्या व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे. तुम्ही जर तुमचे उत्तर ठरवलेल्या वेळेत नोंदवले नसेल तर हि व्यक्ती प्रत्येक घरी जाऊन तुमच्या प्रतिसादाची नोंद करून घेईल.

## जनगणना प्रतिनिधी कधी घरी येतील?

बहुतांश विभागात, जनगणना प्रतिनिधी हे मे मध्यापासून ते जुलै च्या शेवटी पर्यंत भेट देतील. ज्या भागात खूप प्रमाणात ऑफ- कॅम्पस कॉलेज चे विद्यार्थी आणि लोकसंख्या आहे ( उदारणार्थ - जेष्ठ नागरीक) अशा भागात, जनगणना प्रतिनिधीनी तुमच्या घराला भेट द्यायची प्रक्रिया साधारणपणे एप्रिल च्या सुरुवातीला सुरु होईल.

## जनगणना प्रतिनिधी ला कसे ओळखाल?

सर्वप्रथम, तुम्ही त्या व्यक्तीचे "ओळखपत्र" विचारू शकता. सर्व जनगणना प्रतिनिधींना आपले अधिकृत सरकारी ओळखपत्र ज्यावर त्यांचे नाव, छायाचित्र, डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स चा वॉटरमार्क आणि ते ओळखपत्र कधी पर्यंत वैध आहे ती तारीख लिहिलेली असेल.

डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स चे बोधचिन्ह हे www.commerce.gov आणि जनगणना कार्यालयाचे बोधचिन्ह हे www.census.gov ह्या संकेत स्थळावरून प्राप्त झाले आहे.

- जनगणना प्रतिनिधीकडे त्याची अधिकृत बॅग असेल ज्यावर जनगणना कार्यालयाचे बोधचिन्ह आणि त्यात लॅपटॉप, स्मार्टफोन किंवा टॅबलेट असेल ज्याद्वारे तुम्ही जनगणनेचे सर्वेक्षण करू शकता.
- जनगणना प्रतिनिधी तुम्हाला जनगणनेच्या कार्यालयातून अधिकृत लेटरहेड वर इंग्लिश भाषेत लिहिलेलं पत्र दाखवेल ज्यावर जनगणना प्रतिनिधी तुमच्या घराला का भेट देत आहेत ह्याची माहिती लिहिलेली असेल.
- जनगणना प्रतिनिधी त्यांचे काम हे स्थानिक वेळेप्रमाणे सकाळी ९ ते रात्री ९ ह्या वेळेमध्ये पूर्ण करतील.
- तुमच्या विनंती अनुसार जनगणना प्रतिनिधी तुम्हाला त्याच्या पर्यवेक्षका सोबत संपर्क साधण्यासाठी लागणारी माहिती (उदारणार्थ- नाव, पत्ता) किंवा प्रादेशिक जनगणना कार्यलयाचा फोन नंबर **http://2020census.gov/en/contact-us/rcc** देऊ शकतात. प्रादेशिक जनगणना कार्यलय हे तुमच्या विभागात काम करणाऱ्या जनगणना प्रतिनिधी आणि त्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करते.
- तुम्हाला जर स्वतंत्रपणे जनगणना प्रतिनिधी हा खरोखरच अधिकृत प्रतिनिधी आहे ह्याची खात्री करून घ्यायची असेल तर, तुम्ही त्याचे नाव जनगणना कार्यालयाच्या कर्मचारी संकेतस्थळावर टाकून बघू शकता **https://www.census.gov/cgi-bin/main/email.cgi** किंवा तुमच्या प्रादेशिक जनगणना कार्यलयाशी संपर्क साधू शकता.
- **जनगणना प्रतिनिधी कधीही तुमच्या घरात येण्याची मागणी करणार नाही.**

## जनगणना प्रतिनिधी कडून मला कोणते प्रश्न विचारण्यात येतील?

जनगणना प्रतिनिधी फक्त जनगणनेच्या प्रश्नवलीत जे प्रश्न विचारलेले आहेत तेच प्रश्न तुम्हाला विचारेल. (ह्या प्रश्नांची उत्तर देण्यासाठी तुमचे किमान वय हे १५ असावे). तुम्हाला तुमचा पत्ता, फोन नंबर, तुमच्या घरात किती माणसं राहतात, तुमचे घर हे स्वतःचे आहे का भाड्याचे, आणि घरात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीबद्दलची माहिती (नाव, वय, जन्मतारीख, लिंग, तुमचे नाते, वर्ण, वंशिकता(एथनिसिटी)). लक्षात ठेवा त्या पत्त्यावर राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची म्हणजे तान्ही मुलं, लहान मुलं, घरातील इतर व्यक्ती, आणि रूममेट्स ह्यांची सुद्धा माहिती पुरवायची आहे. काहीवेळा घरातील लहान मुलांना मोजले जात नाही पण त्यांची गणना होते सुद्धा खूप महत्वाचे आहे.

कुटुंबातील मोठ्या आणि लहान मुलांची गणना कशी करायची ह्याची तथ्यपत्र आणि अधिक माहिती तुम्हाला **www.countusin2020.org/resources** ह्या संकेत स्थळावर सापडेल.

## जनगणना प्रतिनिधी कडून तुम्हाला पुढील गोष्टीबाबत कधीच विचारणा करण्यात येणार नाही - नागरिकत्व, गाडीचे लायसन्स, सोशल सिक्युरिटी नंबर, क्रेडिट कार्ड, बँक, किंवा तत्सम आर्थिक माहिती, तुमचे आर्थिक व्यवहार, देणगी, पिन कोड आणि पासवर्ड.

मे महिन्यापर्यंत जर जनगणनेला उत्तर दिले नाही तर जनगणना कार्यलय कशाप्रकारे माझ्याशी फॉलो-अप करेल?

- साधारण मी महिन्याच्या १५ तारखेपासून जनगणना प्रतिनिधी तुमच्या घराला भेट देतील आणि तुमच्या कडून जनगणनेचे उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करतील.

- जनगणना प्रतिनिधी जेव्हा तुमच्या घरी येतील तुम्ही तेव्हा जनगणनेची प्रश्नावली पूर्ण करू शकता. तुम्हाला जर तेव्हा हे शक्य नसेल, तर तुम्ही जनगणना ही ऑनलाईन  जाऊन किंवा फोनद्वारे जुलै पर्यंत पूर्ण करू शकता.
- जनगणना प्रतिनिधी जेव्हा तुमच्या घरी येईल आणि जर घरी कुणी नसेल तर " भेट नोटीस" चे पोस्टकार्ड ज्यावर तुमच्या घराचा क्रमांक असेल ते ठेवून जातील. ह्या घर क्रमांकाचा वापर तुम्ही जनगणनेच्या प्रश्नावली ला ऑनलाईन किंवा फोन द्वारे उत्तर देताना करू शकता.
- वरील प्रयत्न करून सुद्धा तुमचे उत्तर आले नाही तर जनगणना प्रतिनिधी आठवड्याने पुन्हा एकदा तुमच्या घराला भेट देतील आणि  "फॉलो-अप पोस्टकार्ड"  देतील.
- जनगणना प्रतिनिधी साधारणपणे सहा वेळा तुमच्या घराला भेट देण्याचा प्रयत्न करतील.
- तिसऱ्यांदा भेट देऊन सुद्धा तुमची भेट झाली नाही तर जनगणना प्रतिनिधी तुमच्या जवळ राहणाऱ्या शेजार्यांना, पोस्टमास्तरला तुमच्या संबंधीची माहिती विचारून त्यानुसार जनगणनेचि प्रश्नावली पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील.

जनगणने संबंधीची अधिक माहिती मिळवण्यासाठी ***www.countusin2020.org/resources*** ह्या संकेत स्थळाला भेट द्या.

# How to Identify a Census Taker

You can respond to the census:

- ☑ Online
- ☑ By phone
- ☑ Through the paper form

Starting in mid-May 2020, census takers will visit households that have not yet responded to the census



A census taker can be identified by their official Census Bureau:

ID
Bag or laptop
Letter

You can also check with your Regional Census Center by phone or on the Census Bureau staff directory

A census taker will never ask to enter your home

A census taker will ONLY ask the questions that appear on the census form

Remember to include everyone who lives at your address including babies, young children, other family members, and roommates

The census taker will NOT ask for your:

- ☒ Driver's license
- ☒ Social Security Number
- ☒ Credit card, bank, or other financial information
- ☒ Money or a donation
- ☒ PIN codes or passwords